Impact Factor-8.632, (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed


**Multidisciplinary International Research Journal**

**October -2023**

ISSUE No - (CDXXXI ) 431 -A



"Contribution of Pre-Independence & Post-Independence Reformers & Reform Movements to Indian Renaissance (1818 AD to 2020 AD)"



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr. S. M. Jogdand
( I/C Principal)
Shri Shivaji College of Art's, Comm. & Sci., Kandhar, Dist.Nanded

**Editors:**
Dr. C.K.Dhondge
Dr.V.K. Sakhare
Dr.S.R. Ragade
Mr.V.S. Perke

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXI) 431 -A
ISSN : 2278-9308
October 2023

# गो. ग. आगरकर यांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्य

प्रा. डॉ. वसंत कदम

इतिहास विभाग प्रमुख,हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,हिमायतनगर, जि.नांदेड.

महाराष्ट्राच्याच नव्हे तर आधुनिक भारताच्या इतिहासात जे जे असामान्य समाज सुधारक होऊन गेले त्यामध्ये गोपाळ गणेश आगरकर यांच्या नावाचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो. एकोणिसाव्या शतकात नवसमाज निर्माण करण्यासाठी वैचारिक प्रबोधनाचा पाया महाराष्ट्रात ज्या ज्या समाजसुधारकांनी रचला त्यामध्ये थोर विचारवंत, शिक्षणतज्ञ, पत्रकार  समाजसुधारक, गोपाळ गणेश आगरकर यांच्याही  नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो, गो.ग. आगरकर हे केवळ बोलके समाज सुधारक नसुन तर ते बोललेले कृती करून दाखविण्यामध्ये अग्रेसर असणारे सुधारक होते. त्यांनी आयुष्यभर समाजसेवेचे वृत्त घेऊन समाजातील अनिष्ट रूढी परंपरांच्या विरोधात आणि विशेषतः स्त्री स्वातंत्र्याच्या बाबतीत अनेक प्रखड लेख लिहून स्त्री सुधारणे शिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही हे लक्षात घेऊन स्त्रियांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केल. समाजसेवा हीच राष्ट्रसेवा हे वृत्त धारण करून आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण समाजसेवेत घालवला ,समाजाने विवेकाच्या तारतम्याच्या आधारे नवीन तत्त्वाचा स्वीकार केला पाहिजे ,ग्रंथ प्रामाण्यवादापेक्षा बुद्धी प्रामाण्यवाद अंगीकारला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणूनच ते बुद्धिवादाचे जनक म्हणून ओळखले जातात. प्रस्तुत शोधनिबंधात गोपाळ गणेश आगरकर यांच्या विचारातील स्त्री स्वातंत्र्याचा अभ्यास प्रस्तुत केलेला आहे.

गोपाळ गणेश आगरकर यांनी भारतीय समाज जीवनाचा सखोल अभ्यास केला भारतीयांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी ते सतत धडपडत होते समाज प्रबोधनासाठी आगरकरांनी प्रथमतः मराठा केसरी आणि सुधारक या वर्तमानपत्राच्या माध्यमातून अनेक वैचारिक लेख लिहून वैचारिक दृष्टिकोनातून समाज सुधारण्याचे कार्य सुरू केले. व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, स्त्री पुरुष समानता व विज्ञान निष्ठता हीच  खऱ्या अर्थाने समाज सुधारण्याची जीवनमूल्य आहेत असे त्यांनी विचार मांडले तत्कालीन समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते पुरुषांच्या मर्जी विरुद्ध त्यांना कसलाही अधिकार नव्हता, स्त्रियांचे जीवन फार कष्टमय होते त्यामुळे गोपाळ गणेश आगरकर यांनी स्त्रियांच्या जीवनात सुधारणा व्हाव्यात स्त्रियांच्या जीवनात धारणा करण्यासाठी अनेक लेख लिहून महत्त्वपूर्ण विचार मांडले

माणसाच्या परस्पर संबंधाची खरी सुरुवात घरापासून होते म्हणूनच आगरकरांनी सामाजिक सुधारणेच्या कार्यामध्ये कुटुंब सुधारणेला महत्त्वाचे स्थान दिले आपली गृहस्थिती सुधारल्याखेरीज आपली सामाजिक परिस्थिती कधी सुधारणार नाही असे त्यांना वाटत होते ज्यांना बाहेरच्या गुलामगिरीचे उच्चाटन करावयाचे आहे त्यांनी अगोदर आपल्या घरातील गुलामगिरी नाहीशी करण्याचा प्रयत्न करावा असे त्यांनी स्पष्ट केले भारतीय समाज व्यवस्थेत आपण स्त्रियावर अंधपरंपरेच्या चालीरीतीप्रमाणे अत्याचार करून त्यांना गुलामगिरीत ठेवत आहते.

आगरकरांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्या विषयी आपले विचार मांडत असताना मराठमोळा व मराठमोळ्यांची पूर्वणी अशा शीर्षकाचे दोन लेख सुधारक या पत्रात लिहून स्त्री दास्य विमोचनाचा प्रश्न आग्रहाने मांडला. स्त्री शिक्षण, बालविवाह,सतीप्रथा,विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न, विधवांची वाईट अवस्था व केशवपण याबाबतीत आगरकरांनी अतिशय रोखठोक बुद्धीवादी भूमिका घेतली. स्त्रियांची बाजू घेताना ते म्हणतात, बायका किंवा स्त्रिया ह्या केवळ प्रज्योत्पादनाची हिंडती फिरती यंत्र आहेत असे पुरूषांनी मुळीच समजू नये. स्त्रियांना किंवा बायकांना काही कळत नाही, बुद्धी नाही, रूची नाही, का मन नाही, का बरे वाईट समजण्याची अक्कल नाही, त्यांच्यात पुरुषापेक्षा कशाची

कमी आहे, पुरुषांना ज्याप्रमाणे सुखदुःख आहेत त्याच प्रमाणे त्यांनाही आहेत मग त्यांनाच या भयंकर अज्ञातवासात कशासाठी ठेवावे. स्त्रियांना घरात कोंडून का ठेवता ? त्यामुळे समाजाचा विकास हा केवळ पन्नास टक्के वेगानेच होत आहे, म्हणून स्त्रियांना चार भिंतीच्या आत न ठेवता पुरुषाप्रमाणेच प्रशस्तपणे स्वतंत्र विचाराने वेगवेगळ्या क्षेत्रात, शास्त्रात, कलेत, संगीतात, व्यवहारात व उद्योगात निष्णांत केले पाहिजे अशी भूमिका आगरकर घेतात. स्त्री-पुरुषांमधील संबंध हे स्वामी आणि सेवक न राहता ते संबंध समानतेच्या आणि समतीच्या पायावर असले पाहिजेत, भारतीय समाज व्यवस्थेने स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान, आणि वाईट वागणूक दिलेली आहे. त्याबरोबरच भारतीयांच्या समाजव्यवस्थेतील संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे स्त्री दास्य बळकट होते म्हणून आगरकर विभक्त कुटुंब पद्धतीचा पुरस्कार करतात म्हणून स्त्री सुधारणे शिवाय समाजाची प्रगती होणार नाही असा त्यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडला तसेच तत्कालीन समाजात पतीच्या निधनानंतर त्या स्त्रीचे केशवपन केले जाई ही प्रथा अमानवी ,अविचारी रानटी, अमंगल, निंदनीय व अन्यायकारक आहे असे ते म्हणाले, आगरकरांचे सहकारी फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य वामन शिवराव आपटे यांचा मृत्यू झाला त्या समई त्यांच्या पत्नीचे केशव पण केले गेले हे पाहून आगरकरांचे दुःख त्यांच्या काळजाला भिडले त्यांनी घरी आल्यानंतर आपली पत्नी यशोदाबाई कडून माझ्या मृत्यूनंतर तू केशव पण करणार नाही अशी शपथ घेण्यस भाग पाडले, सक्तीचे वैधव्य आणि केशवपण पद्धतीवर टीका करत असताना आगरकरांनी "शहाण्यांचा मूर्खपणा" हा लेख लिहून पतीच्या मृत्यूनंतर त्या स्त्रीविधवांना जिवंतपणी कशा नरक यातना सहन कराव्या लागतात त्यासंबंधी प्रखर विचार मांडले. त्याच काळात विधवांच्या पुनर्विवाह च्या संदर्भाने विष्णुशास्त्री पंडित यांनी जे प्रयत्न केले त्यांचा आगरकरांनी गौरव केला. स्त्रियाप्रमाणे पुरुषांनीही पत्नीच्या मृत्यूनंतर पुनर्विवाह करू नये, स्त्रीला एक न्याय व पुरुषाला एक न्याय असे का ? स्त्रीचा पुनर्विवाह हा अधर्म, अपवित्र,अनितीमूलक आणि चुकीचा आहे मग पुरुषांनी पुनर्विवाह करणे हे अपवित्र आणि अधर्म नव्हे का असे त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

अमुक वयाच्या आत बाल विधवांनी किंवा स्त्रियांनी केशवपण करू नये आणि अमुक वयाच्या नंतरही स्त्रियांच्या मर्जीविरुद्ध केशवपन होऊ नये यासाठी सरकारने कायदा करावा असे त्यांनी विचार मांडले. दिनबंधू या वृत्तपत्रात न्हावी लोकांनी विधवांचे केस ओपन करू नये असा लेख लिहिला त्यावेळी आगरकरांनी या वृत्तपत्राचे संपादक व लेखकाचे अभिनंदन करून आभार मानले.

त्या काळातील समाजात सरास बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. या प्रथेमुळे स्त्रियांच्या जीवनात अनेक समस्या आणि अडचणी निर्माण झालेल्या होत्या आगरकरांच्या मते विवाह नंतर अपत्य संगोप, संसाराची जबाबदारी आणि प्रपंच चालविणे ही कामे व्यवस्थित होण्यासाठी बालविवाह टाळणे स्त्री आणि समाजहिताचे आहे या बालविवाह प्रथेमुळे संततीवर समाजावर व बालस्त्री मनावर अत्यंत वाईट परिणाम होतात बालवैधव्य त्यांचे केशवपन यासारख्या समस्येला समोर जाण्याची वेळ येते बालविवाह हा स्त्रियांच्या आरोग्य साठी हानिकारक ठरतो तसेच या प्रथेमुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्य हानी झाली आहे, सदगुणांचा ऱ्हास झाला आहे तसेच शक्तीहिनता, धाडसीपणाचा अभाव, मंदबुद्धी इत्यादी दुर्गुण आपल्या ठायी आले आहेत, त्यामुळे आगरकरांनी बालविवाहाची प्रथा कायद्याने बंद करण्यासाठी सरकारकडे आग्रह धरला तसेच त्यांनी प्रौढ विवाह अमलात येण्यासाठी गाजत असलेल्या संमती वयाच्या बिलास पाठिंबा दिला, बालविवाह रोखण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी व सुशिक्षितांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र बालविवाह निषेधक मंडळी ही संस्था स्थापन करून बालविवाहाच्या विरोधात संघटितपणे कार्य करावे असे ते म्हणतात.

प्राचीन काळात भारतात स्वयंवर विवाह प्रथा प्रचलित होती या प्रथेत मुलीला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य मिळत असे त्यावेळी बालविवाह नव्हती मध्ययुगात बालविवाहाची प्रथा सुरुवात झाली त्यामुळे प्राचीन

काळात अस्तित्वात असलेल्या स्वयंवर विवाह पद्धतीचे समर्थन आगरकर करतात. इतकेच नाही तर आगरकर यांच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत विचार मांडत असताना जरट विवाहप्रतेस विरोध करतात तसेच स्त्रियांचा पोशाख कसा असावा याबाबत ते विचार मांडतात "आमच्या स्त्रियांचे पेहराव" या शीर्षकाचे त्यांनी दोन लेख लिहिले साडी आणि चोळी हा स्त्रियांचा पोशाख होता पदर सावरण्यात त्यांना त्रास होत होता त्यामुळे स्त्रियांनी चोळीच्या वर जॅकेट वापरावे पायात बूट वापरावे थंडीच्या दिवसात हातमोजे वापरावे पायमोजे वापरावे असे ते म्हणतात तसेच अलंकाराच्या बाबतीत आपले मत व्यक्त करीत असताना "अलंकार मीमांसा आणि दागिन्याचा सोस" हे दोन लेख लिहिले अलंकारामुळे स्त्रियांना अनेक तोटे सहन करावे लागतात त्यामुळे खोटे अलंकार वापरून सोने विकत घेण्यापेक्षा तोच पैसा बँकेत ठेवा त्यावर व्याज मिळेल असा सल्ला आणि उपदेश ते स्त्रियांना करतात.

संतती नियमनाच्या बाबतीतही विचार मांडत असताना आपले कुटुंब ऑटोपशील ठेवण्याची जबाबदारी पुरुषांनी घेतली पाहिजे, स्त्रियांच्या इच्छेनुसार आणि परिस्थितीस अनुसरून संतती उत्पन्न व्हावी मुले इतकीच झाली पाहिजेत असा आग्रह पुरुषांनी कधीच करू नये, स्त्रियांना होणारी संतती त्यांच्या इच्छेनुसार आणि संतोषाने व्हावी कारण बाळंतपणाचे क्लेश व त्रास पुरुषांना माहिती नसतो त्यामुळे कृत्रिम साधनांचा उपयोग करून संतती नियमन करावे असा सल्ला ते पुरुषांना देतात त्याचबरोबर शिक्षण हेच खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाचे साधन आहे हे लक्षात घेऊन स्त्री शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याखेरीज समाजाची सर्वांगीण प्रगती होणार नाही अशी त्यांची भावना होती. स्त्रियांचे दुःख कमी करण्याचा आणि तिला स्वातंत्र्य देण्याचा उत्तम उपाय म्हणजे स्त्री शिक्षण होय कुटुंब सुखाच्या दृष्टीने सुशिक्षित पत्नी असणे अत्यंत आवश्यक आहे यासाठी स्त्रीला शिक्षण देणे काळाची गरज आहे मुलामुलींना शिक्षण एकत्र द्यावे जे मुलांना शिक्षण दिले जाते तेच शिक्षण मुलींना द्यायला हवे तसेच प्राथमिक शिक्षणाची सक्ती केली पाहिजे आपल्या स्त्रियांना जोपर्यंत आपण घोषातून बाहेर पडून काढून शिक्षण देणार नाही तोपर्यंत समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही असा विचार आगरकरांनी मांडला.

सारांश

गोपाळ गणेश आगरकर यांना एकूण फक्त 39 वर्षे आयुष्य लाभले इतक्या अल्पकाळात त्यांनी आपल्या प्रभावी विचाराने महाराष्ट्राला योग्य वळण देण्याचा प्रयत्न तर केलाच परंतु जुन्या नव्या परंपरा आणि पूजेच्या विरोधाला न जुमानता त्यांनी स्त्रियांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव करताना आचार्य जावडेकर म्हणतात त्यांनी समाजासाठी केलेले समर्पण स्त्रियांच्या स्वातंत्र्यासंदर्भात मांडलेले विचार यामुळे त्यांना खूप विरोध झाला त्यांनी विरोधकांची निंदेची परवा न करता समाज सुधारणेचा वसा घेतलेले आगरकर आपल्या कार्यापासून तसूवरही बाजूला गेले नाही महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत आगरकरांनी जी भुमिका बजावली ती त्यांच्या उज्वल देशभक्तीला साजेल अशीच आहे त्यांच्या कार्याविषयी न र फाटक म्हणतात आगरकरांनी महाराष्ट्रात निर्भयपणे आपले विचार मांडले आणि महाराष्ट्रात सार्वजनिक सेवेचा नवा स्वावलंबी संप्रदाय स्थापन करण्याचा प्रयत्न केला.

संदर्भ सूची:-

१) Ganachari Arvind, (2005), Gopal Ganesh Agarkar, Popular Prakashan, Pune.
२) अळतेकर माधव दा.,(२०२० ) गोपाळ गणेश आगरकर- चरित्रात्मक निबंध, वर्धा प्रकाशन प्रा.लि.,वर्धा.
३) प्रधान ग .प्र.,(संपा.), (२००८) गोपाळ गणेश आगरकर - निवडक लेखसंग्रह, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
४) सोनवणे स्नेहल व इतर, (२०१४), आधुनिक महाराष्ट्र (१८१८-१९६०),सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
५) जावडेकर वि.स.,(संपा.),(१९४५), गोपाळ गणेश आगरकर व्यक्ती आणि विचार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDXXXI) 431 -A
ISSN : 2278-9308
October 2023

६) गाठाळ एस.एस., (२०१६), महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
७) कठारे अनिल, (२०१६), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
८) गव्हाणे किशोर, सुखदेव शिंदे व इतर,(२०१४),आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाशन,लातूर.

We the Research Organization will do provide help for the following works listed below.

*Support for Arts, Commerce & Science all Disciplines*

- Research Paper Publication
- Book Chapters for Publications
- ISBN Publications Supports
- M.Phil Dissertations Publish
- Ph.D. Thesis in Book Format
- ISSN Journals with Impact Factor 8.575
- Online Book Publication
- Seminar Special Issues
- Conference Proceedings

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**Mobile : 9595560278 /**

Aadhar Publications For Details www.aadharsocial.com
New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College, Amravati ( M.S ) India Pin- 444604
, Mob-- 9595560278, Emial: aadharpublication@gmail.com Price:Rs.500/